## प्रेसनोट

### जबरी चोरी करणा-या टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ (मोक्का ) अन्वये कारवाई

दरोडा, जबरीचोरी, गंभीर दुखापत या सारख्या गुन्हे करणा-या टोळीविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा अन्वये कारवाई करण्यात आली असून, यातील टोळी प्रमुख अजय उर्फ भज्या प्रकाश निकाळजे, वय ३५ वर्षे, रा काकडेवस्ती, कोंढवा बु. पुणे याने आपले साथीदार १. मनोज रमेश खाडे, रा गंगाधाम मा.यार्ड, पुणे २. भोलेनाथ बनसोडे, रा आंबिकानगर, बिबवेवाडी, पुणे यांनी दि.९/९/२०१७ रोजी बिबवेवाडी पो.स्टे हद्दीत लखन भानुदास खंडागळे यास पुर्वीचे भांडणाचे कारणावरुन डोक्यात तलवारीने वार करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. त्यानुसार बिबवेवाडी पोलीस स्टेशन ला भा.द.वि.कलम ३०७, ३४ अन्वये गुन्हा दाखल झाला होता, त्याचा तपास पोलीस निरीक्षक, गुन्हे संतोष बर्गे हे करीत होते. सदर गुन्हयाचा तपास करत असताना आरोपीचे रेकॉर्ड तपासले असता टोळी प्रमुख अजय निकाळजे याचे विरुध्द वेगवेगळया पोलीस स्टेशन ला खुन, खुनचा प्रयत्न, जबरी चोरी, गंभीर दुखापत अशा प्रकारचे ०८ गुन्हे दाखल असून मनोज खाडे व भोला बनसोडे यांचेवर अशा प्रकारचे प्रत्येकी ७ गुन्हे दाखल असल्याचे दिसून आले आहे. तसेच सदर आरोपी संघटीत पणे गुन्हे करत असुन बिबवेवाडी व कोंढवा पोलीस स्टेशन हद्दीत त्यांनी दहशत निर्माण केली होती, त्यामुळे पो.नि. बर्गे यांनी सदर टोळीविरुध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अन्वये कारवाई करावी म्हणून अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांचे कडे पो.उपआयुक्त, परि-२ श्री प्रविण मुंढे, यांचे मार्फतीने प्रस्ताव पाठविण्यात आला होता, त्यानुसार अ.पो.आ. श्री सेनगावकर यांनी सदर आरोपी वर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त, डॉ शिवाजी पवार, स्वारगेट विभाग हे करीत आहेत.

मालमत्ते विरुध्द व शरीराविरुध्द गुन्हे करणा-या गुन्हेगारावर कडक कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त, रश्मी शुक्ला यांनी दिलेले असुन २०१७ मध्ये अद्याप पर्यंत वेगवेगळया १२ टोळयांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.